# ठाकूर ग्रीन व्हॅली स्कूलमध्ये विविध क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ

## क्रीडा सभापती नागेश सहारे यांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उद्घाटन

**नागपूर, ता. २३ :** नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त शहरातील पुनारोड पारडी येथील ठाकूर ग्रीन व्हॅली स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. मनपा क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले. स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांना हिरवी झेंडी दाखवून क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांनी क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ केला.

उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव पंकज बावनकुळे होते. यावेळी मुख्याध्यापक विठ्ठल विंचुरकर, रणधीर उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजेश बावनकुळे, क्रीडा शिक्षक सचिन कलोडे, शाळेतील शिक्षिका वैशाली कडू, रजनी डोमकुलवार, रूपाली बोरकर, शिक्षक वसंत रामटेके, शंकर पिंपळकर, गौरव शेलारे, धर्मेश गायकवाड, भूपेश बोरकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी मनपा क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांनी आपल्या मार्गदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांना विविध खेळांसाठी प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे संचालन विजया पंचभाई यांनी केले तर आभार अनिल भुजाडे यांनी मानले.